513)
17/10/25 1239

जिल्हा परिषद, गडचिरोली
मु. का. अ. यांचे कार्यालय
दिनांक 14 OCT 2025
GAD
ल. लि. / मु.का.अ. / विभाग

महाराष्ट्र शासन
# जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली
(निवडणूक शाखा)
कॉम्पलेक्स एरिया, गडचिरोली ता.जि.गडचिरोली-442605
दुरध्वनी क्रमांक 07132-222011/222086 Email – dcgen.gadchiroli@gmail.com

क्र.कार्या-10/स.म.अ.जिपपंस/कावि/525 /2025 दिनांक :- 13 ऑक्टोंबर, 2025

जिल्हा परिषद, गडचिरोली
(सामान्य प्रशासन विभाग)
आवक क्र........
दिनांक 15 OCT 2025
शाखा..... परिषद

**निवडणूक तात्काळ/अत्यंत महत्वाचे**

प्रति,
1) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, गडचिरोली
2) जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी
गडचिरोली

विषय :- जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-2025 करीता गडचिरोली जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समितीमधील निश्चित करण्यात आलेल्या जागांचे आरक्षण परिशिष्ट-9(अ) व 9(ब) मधील प्रारुप अधिसूचना जिल्ह्याचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :-1. ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन अधिसूचना दिनांक 20 ऑगष्ट, 2025
2. मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्र.रानिआ/जिपांस-2025/प्र.क्र.30/का.7 दि. 01.10.2025
3. मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे आदेश क्र.रानिआ/जिपपंस-2025/प्र.क्र.29/का-7दि.1.10.2025

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-2025 चे अनुषंगाने संदर्भीय पत्रातील निर्देशानुसार गडचिरोली जिल्ह्यातील 51 जिल्हा परिषद निवडणूक विभाग व 102 पंचायत समिती निर्वाचक गणांचे आरक्षण सोडत दिनांक 13.10.2025 रोजी काढण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने संदर्भीय पत्रातील निर्देशानुसार जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समितीमधील निश्चित करण्यात आलेल्या जागांचे आरक्षण परिशिष्ट- 9 (अ) व 9 (ब) मधील प्रारुप अधिसूचना जिल्हयाचे संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत निर्देश आहेत.

करीता, यासोबत सलग्न करण्यात आलेले गडचिरोली जिल्ह्यातील जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समितीमधील निश्चित करण्यात आलेल्या जागांचे आरक्षण परिशिष्ट- 9 (अ) व 9 (ब) यासोबत पाठविण्यात येत असून सदरहू आरक्षण सोडत बाबत परिशिष्ट- 9 (अ) व 9 (ब) जिल्ह्याचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे. हि विनंती.

सहपत्र :- परिशिष्ट- 9 (अ) व 9 (ब)

(राहूल जाधव)
उप जिल्हा निवडणूक अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली

# परिशिष्ट-९ (अ)

## जिल्हा परिषदेतील प्रारुप आरक्षणाबाबतची अधिसूचना

क्रमांक कार्या-१०/स.म.अ/जिपपंस/निवडणूक/कावि- ५२३ /२०२५, दिनांक १३.१०.२०२५ ज्याअर्थी; राज्य शासनाकडून शासन आदेश क्रमांक जिपनि-२०२५/प्र.क्र.३६/पं-रा.२, दिनांक १२ जून, २०२५ व ग्रामविकास विभाग यांचे दिनांक १२ जून, २०२५ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या प्रभाग रचना कार्यक्रमानुसार गडचिरोली जिल्हा परिषदेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीकरिता ५१ निवडणूक विभागांच्या भौगोलिक सिमा क्र. कार्या-१०/स.म.अ/ग्रापनि/कावि-४२२/२०२५, दिनांक २२.०८.२०२५ च्या अधिसूचनेन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आल्या आहेत;

आणि ज्याअर्थी; महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील तरतुदी अन्वये आणि राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिया/जिपपंस-२०२५/प्र.क्र.२९/का-७ दिनांक ०१.१०.२०२५ च्या आदेशान्वये गडचिरोली जिल्हा परिषदेतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसह) राखून ठेवावयाच्या जागा निश्चित केल्या आहेत;

आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाकडील क्र. आदेश क्र. रानिया/जिपपंस-२०२५/प्र.क्र.२९/का-७ दिनांक ०१.१०.२०२५ च्या आदेशान्वये आरक्षण सोडत काढून त्याची सोडतीव्दारे काढण्यात आलेल्या आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान केले असून सदर आदेशान्वये दिलेल्या कार्यक्रमानुसार गडचिरोली जिल्हा परिषदेतील आरक्षित निवडणूक विभागांची जाहीर सोडत दिनांक १३.१०.२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता काढण्यात आली. सदर सोडतीनंतर निश्चित झालेले निवडणूक विभागनिहाय आरक्षणाची प्रारुप अधिसुचना याव्दारे प्रसिध्द करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी; सदर प्रारुप आरक्षणाची अधिसुचना जिल्हा परिषद क्षेत्रातील सर्व रहिवाश्यांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत असून सूचना देण्यात येत आहेत की, सदर प्रारुप आरक्षण अधिसूचनेस, ज्या लोकांच्या काही हरकती असतील, त्यांनी त्या जिल्हाधिकारी गडचिरोली यांच्याकडे दिनांक १४.१०.२०२५ ते १७.१०.२०२५ या कालावधीत सादर कराव्यात. सदर तारखेनंतर आलेल्या हरकती विचारात घेण्यात येणार नाही.

**गडचिरोली जिल्हा परिषदेतील एकूण जागांचा तपशील**

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी महिलांकरिता आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ५ | ३ |
| २ | अनुसूचित जमाती | २२ | ११ |
| ३ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | १३ | ७ |
| ४ | सर्वसाधारण | ११ | ५ |
| | एकूण | ५१ | २६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३० | चामोर्शी | ३० घोट-सुभाषग्राम | सर्वसाधारण (महिला) |
| ३१ | चामोर्शी | ३१ दुर्गापूर-वायगाव | सर्वसाधारण (महिला) |
| ३२ | चामोर्शी | ३२ आष्टी-इल्लूर | सर्वसाधारण |
| ३३ | मुलचेरा | ३३ कालीनगर-विवेकानंदपूर | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) |
| ३४ | मुलचेरा | ३४ सुंदरनगर-गोमणी | सर्वसाधारण (महिला) |
| ३५ | मुलचेरा | ३५ कोठारी-शांतीग्राम | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) |
| ३६ | एटापल्ली | ३६ जारावंडी-कसनसूर | अनुसूचित जमाती |
| ३७ | एटापल्ली | ३७ गट्टा-हेडरी | अनुसूचित जमाती |
| ३८ | एटापल्ली | ३८ गेदा-हालेवारा | अनुसूचित जमाती (महिला) |
| ३९ | एटापल्ली | ३९ पंदेवाही स.-बुर्गी स. | अनुसूचित जमाती (महिला) |
| ४० | भामरागड | ४० आरेवाडा-लाहेरी | अनुसूचित जमाती |
| ४१ | भामरागड | ४१ कोठी-येचली | अनुसूचित जमाती (महिला) |
| ४२ | अहेरी | ४२ खमनचेरु-नागेपल्ली | अनुसूचित जमाती (महिला) |
| ४३ | अहेरी | ४३ वेलगुर-आलापल्ली | सर्वसाधारण |
| ४४ | अहेरी | ४४ महागाव-देवलमारी | अनुसूचित जमाती |
| ४५ | अहेरी | ४५ पेरमीली-राजाराम | अनुसूचित जमाती (महिला) |
| ४६ | अहेरी | ४६ रेपनपल्ली-उमानूर | अनुसूचित जाती |
| ४७ | अहेरी | ४७ जिमलगट्टा-पेठा | अनुसूचित जमाती (महिला) |
| ४८ | सिरोंचा | ४८ झिंगानूर-आसरअल्ली | सर्वसाधारण |
| ४९ | सिरोंचा | ४९ विठ्ठलरावपेठा माल-जाफ्राबाद चेक | अनुसूचित जाती (महिला) |
| ५० | सिरोंचा | ५० नारायणपूर-जानमपल्ली | अनुसूचित जाती (महिला) |
| ५१ | सिरोंचा | ५१ लक्ष्मीदेवीपेठा-अंकिसा माल | अनुसूचित जाती (महिला) |

ठिकाण :- गडचिरोली

दिनांक :- १३.१०.२०२५

जिल्हाधिकारी यांचे कार्यालय गडचिरोली

( अविश्यांत पंडा, भा.प्र.से.)

जिल्हाधिकारी, गडचिरोली

# गडचिरोली जिल्हा परिषदेतील निवडणूक विभाग निहाय आरक्षणाचा तपशील

| अ.क्र. | तालुका | निवडणूक विभागाचा क्रमांक व नाव | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | कोरची | १ कोटरा-बिहिटेकला | अनुसूचित जमाती (महिला) |
| २ | कोरची | २ बेडगाव-कोटगुल | अनुसूचित जमाती |
| ३ | कुरखेडा | ३ पलसगड-पुराडा | अनुसूचित जमाती |
| ४ | कुरखेडा | ४ तळेगांव-वडेगांव | अनुसूचित जमाती |
| ५ | कुरखेडा | ५ गेवर्धा-गोठणगाव | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला |
| ६ | कुरखेडा | ६ कढोली-सावलखेडा | अनुसूचित जमाती |
| ७ | कुरखेडा | ७ अंगारा-येंगलखेडा | अनुसूचित जमाती (महिला) |
| ८ | देसाईगंज | ८ कोरेगाव-डोंगरगाव (हलबी) | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| ९ | देसाईगंज | ९ विसोरा-सावंगी | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) |
| १० | देसाईगंज | १० कुरुड-कोकडी | सर्वसाधारण |
| ११ | आरमोरी | ११ वैरागड-मानापूर | अनुसूचित जमाती (महिला) |
| १२ | आरमोरी | १२ पळसगांव-जोगीसाखरा | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| १३ | आरमोरी | १३ ठाणेगांव-इंजेवारी | सर्वसाधारण |
| १४ | आरमोरी | १४ सिर्सी-वडधा | अनुसूचित जमाती |
| १५ | धानोरा | १५ मुस्का-मुरुमगांव | अनुसूचित जमाती (महिला) |
| १६ | धानोरा | १६ येरकड-रांगी | अनुसूचित जमाती (महिला) |
| १७ | धानोरा | १७ चातगाव-कारवाफा | अनुसूचित जमाती |
| १८ | धानोरा | १८ पेंढरी-गट्टा | अनुसूचित जमाती |
| १९ | गडचिरोली | १९ मौशिखांब-मुरमाडी | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| २० | गडचिरोली | २० वसा-पोर्ला | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) |
| २१ | गडचिरोली | २१ कोटगल-मुरखळा | अनुसूचित जाती |
| २२ | गडचिरोली | २२ जेप्रा-विहिरगाव | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| २३ | गडचिरोली | २३ मुडझा-येवली | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) |
| २४ | चामोर्शी | २४ कुनघाडा रै-तळोधी मो. | सर्वसाधारण (महिला) |
| २५ | चामोर्शी | २५ विसापूर रै-कुरुळ | सर्वसाधारण (महिला) |
| २६ | चामोर्शी | २६ विक्रमपूर-फराडा | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) |
| २७ | चामोर्शी | २७ भेंडाळा-मुरखळा | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| २८ | चामोर्शी | २८ लखमापूर बोरी-गणपूर रै | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| २९ | चामोर्शी | २९ हळदवाही-रेगडी | सर्वसाधारण |

## परिशिष्ट-१०

## गडचिरोली जिल्हा गडचिरोली जिल्हा परिषद/पंचायत समिती

## सुचना

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा अधिनियम,५) चे तरतुदी अन्वये ५१ जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १२ पंचायत समितीच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीसाठी त्या जिल्हा परिषद क्षेत्रातील निवडणूक विभागाची व पंचायत समित्यांमधील निर्वाचक गणातील एकूण सदस्य संख्या, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, सर्वसाधारण स्त्रियांसह) राखून ठेवण्यात आलेले निवडणूक विभाग व निर्वाचक गणाबाबत जिल्हाधिकारी गडचिरोली क्रमांक कार्या-१०/स.म.अ/जिपपंस/निवडणूक/कावि- ५२३ व ५२४ /२०२५, दिनांक १३.१०.२०२५ च्या प्रारुप आरक्षणाची अधिसूचनेची प्रत खाली दर्शविलेल्या ठिकाणी प्रसिध्द करण्यात येत आहे व अशी सूचना देण्यात येत आहे की, उक्त मसुदा जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्याकडून त्या आदेशात नमूद केल्यानुसार दिनांक १४.१०.२०२५ नंतर विचारात घेण्यात येईल.

१. जिल्हाधिकारी गडचिरोली यांचे कार्यालयातील फलकावर
२. जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे कार्यालयातील फलकावर
३. तहसिलदार सर्व यांचे कार्यालयातील फलकावर
४. पंचायत समिती सर्व कार्यालयातील फलकावर

२. आदेशाच्या मुसद्यात कुणाची हरकत किंवा सूचना असल्यास त्यासंबंधीची जी सकारण लेखी निवेदने/हरकती/सूचना जिल्हाधिकारी यांचेकडे दिनांक १७.१०.२०२५ पर्यंत सादर करावेत. उपरोक्त तारखेनंतर जिल्हाधिकारी यांच्याकडे आलेली निवेदने/हरकती/सूचना इत्यादी विचारात घेतले जाणार नाहीत.

दिनांक :- १३.१०.२०२५

जिल्हाधिकारी यांचे कार्यालय गडचिरोली

(अविश्यांत पंडा, भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी, गडचिरोली**